नियमित फौ. ख.क्र.१३५ /२०१६ निशाणी क्र. ५१

**अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्र.१ ची जबानी**

मी शपथेवर कथन करतो की,

माझे नांव - वंदना सोपान सोनवणे

वय - ४९ वर्षे-

कामधंदा - शेती

राहणार - जातेगाव, ता.नांदगांव, जि.नाशिक.

१. **सरतपास सरकारी अभियोक्ता श्री.चेतन जायलवाळ यांचे मार्फेत-**

आरोपी माझे नातेवाईक आहेत. दि. ३१.०५.२०१६ रोजी माझ्या सासऱ्यांचे डोळ्यांचे ऑपरेशन झाले असल्याने त्यांना भेटण्यासाठी पाहुणे आले होते. दुपारी ५:०० वाजेच्या सुमारास माझ्या पतीने पाहुण्यांना जातेगाव मध्ये सोडले. माझे पती पाहुण्यांना सोडून परत येत होते. परत येण्याच्या वाटेवर आरोपीचे घर होते. आरोपी क्र. ४ शकुंतला ही माझ्या पतीच्या गाडीच्या आडवी येऊन त्यांची गाडी अडविली व इतर आरोपींनी काठीने, गजाने माझे पतीस पाठीवर, पायावर व संपूर्ण अंगावर मारहाण केली. त्यांच्या शेतीचा बांध फोडला या कारणाने आरोपींनी माझे पतीस मारहाण केली होती. माझे घर घटनास्थळापासून हाकेच्या अंतरावर आहे त्यामुळे मला त्यांच्या ओरडण्याचा आवाज आला. मी तेथे येऊन पाहिले असता माझे पती बेशुध्द अवस्थेत पडलेले होते. तेथे लोक जमा झाले. त्यांनी माझ्या दीरांना फोन केला तसेच नवनाथ थोरात यांचे गाडीतून माझे पतीस नांदगाव ग्रामीण रुग्णालयात नेले. ज्ञानेश्वर सोनवणे, राजू सोनवणे व दीपक लोंढे हे तिघे जण माझे पतीस दवाखान्यात घेऊन गेले होते. तेथे त्यांच्यावर उपचार केले व तेथून मालेगाव येथे नेले. माझे पती दोन ते तीन दिवस आय.सी.यू .मध्ये होते त्यांनी बरे झाल्यावर मला घटनेबाबत सांगितले व त्यानंतर मी फिर्याद दिली. ती आता मला दाखविण्यात आली. त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. त्यास **निशाणी ५२** देण्यात आली. मी सर्व आरोपींना ओळखते त्यापैकी दोन आरोपी आज रोजी न्यायालयामध्ये हजर आहेत.

**सरतपास – पूर्ण**

## २. उलटतपास आरोपीतर्फे विधीज्ञ श्री. बी.आर. चौधरी यांचे मार्फत-

जातेगावपासून बोलठाण हे गाव पाच कि.मी. अंतरावर आहे. हे म्हणणे खरे आहे की, बोलठाणच्या आजूबाजूच्या गावांसाठी स्वतंत्र पोलीस चौकी आहे व त्याला लागूनच सरकारी दवाखाना आहे. हे म्हणणे खरे आहे की, जातेगावला देखील सरकारी दवाखाना आहे. हे मला सांगता येणार नाही की, जातेगावला पोलीस पाटील आहे किंवा कसे.

माझ्या सासऱ्यांना भेटायला दोन पाहुणे आले होते. त्या दोघांना माझे पती एकाच मोटार सायकलीवर घेऊन गेले होते. दोन्ही पाहुण्या महिला होत्या. हे म्हणणे खरे आहे की, ग्रामीण भागातील महिला मोटार सायकलवर एकाच दिशेकडे दोन्ही पाय घेऊन बसतात. हे म्हणणे खरे आहे की, दोन महिला गाडीवर बसल्या की जागा कमी पडते. माझे घर शेतामध्ये आहे. माझे पती पाहुण्यांना गावामध्ये सोडण्याकरीता गेले होते. सदरचे अंतर दीड ते दोन किलोमीटर इतके आहे. हे म्हणणे खरे नाही की, माझे घरापासून ते गावापर्यंतचा रस्ता कच्चा आहे. साक्षीदार सांगते की, निम्मा रस्ता कच्चा आहे. हे म्हणणे खरे आहे की, सदरचा निम्मा कच्चा रस्ता ओबडधोबड आहे. हे म्हणणे खरे आहे की, सायंकाळी अंधार पडल्यानंतर सदरच्या रस्त्यावर लाइटची कोणतीही व्यवस्था नाही.

हे म्हणणे खरे आहे की, माझे पतीस मी बेशुध्दावस्थेत पडलेले पाहिले त्याच्या अगोदर काय घडले होते हे मी प्रत्यक्ष पाहिलेले नाही. हे म्हणणे खरे आहे की, आरोपींनी लाठ्याकाठ्यांनी व गजांनी मारहाण केली असे जे मी सांगितले ती घटना मी प्रत्यक्ष पाहिली नाही. हे म्हणणे खरे आहे की, मी गेले त्यावेळेस सर्व आरोपी त्यांच्या घरामध्ये होते. त्यानंतर मी माझ्या पतीस घरी घेऊन गेले नाही. त्यावेळेस घटनास्थळावर इतर लोक देखील जमा झाले होते. अंदाजे दहा ते पंधरा लोक होते. मी स्वतः किंवा त्या दहा ते पंधरा लोकांपैकी कोणीही बोलठाणच्या किंवा नांदगावच्या पोलीस स्टेशनमध्ये गेलो नाही.

मी व माझे पती नांदगावला सोबत आलो नव्हतो. ज्ञानेश्वर सोनवणे, राजू सोनवणे हे माझे चुलत दीर आहेत. मी सोबत नसलेमुळे माझे पतीस नांदगावमध्ये सर्वात प्रथम कोठे घेऊन गेले याबाबत मला माहिती नाही. तसेच डॉक्टरांनी उपचार केले किंवा कसे व माझ्या पतीस कोठे पाठविले याबाबत देखील मला माहिती नाही. माझ्या पतीस घटनास्थळावरुन मालेगाव येथील दवाखान्यात घेऊन गेले होते. मी मालेगाव येथील दवाखान्यात दोन दिवसानंतर गेले होते. माझे पतीस केव्हा अॅडमिट केले व कधी डिस्चार्ज देणार आहेत याबाबत मी चौकशी केली नाही. तथाकथित घटनेनंतर दोन

दिवस मी माझे दैनंदिन काम करीत होते. साक्षीदार सांगते की, मी फोनवरुन चौकशी करीत होते. मी पती व दीरांच्या फोनवर चौकशी करीत होते. हे म्हणणे खरे नाही की, त्यांच्या सांगण्यावरुन ताबडतोब दवाखान्यात जाण्याची गरज नव्हती म्हणून मी गेले नाही. माझे पतीस आठ दिवसानंतर म्हणजेच सात किंवा आठ तारखेला डिस्चार्ज दिला. डिस्चार्ज दिल्यानंतर मी पोलीस स्टेशनमध्ये गेली नाही. त्याच्या अगोदर म्हणजेच तीन तारखेला मी पोलीस स्टेशनमध्ये गेले होते. त्यावेळेस माझे पती अॅडमिट होते व त्यामुळे वैद्यकीय प्रमाणपत्र दिलेले नव्हते. हे म्हणणे खरे नाही की, मी हॉस्पीटलमध्ये जाण्याअगोदरच पोलीस स्टेशनमध्ये तक्रार केली होती. मी पोलीस स्टेशनला सकाळी ११:०० वाजता गेले होते व दुपारी ३:०० वाजता माझी तक्रार घेतली. त्यानंतर पुन्हा मी कधीही पोलीस स्टेशनमध्ये गेले नाही. हे म्हणणे खरे नाही की, त्यानंतर पोलीस माझेकडे कधीही आले नाही. पोलीस माझेकडे फिर्याद दिलेनंतर एक ते दोन दिवसांनी व एक ते दोन वेळेस चौकशीकरीता आले होते. हे म्हणणे खरे आहे की, पोलीस आले त्यावेळेस माझे पती घरी नव्हते.

वैभव मुलगा आहे. ज्ञानेश्वर व राजू माझे दीर आहेत. आमचे व आरोपींचे शेत एकमेकांस लागून आहे. हे म्हणणे खरे आहे की, आमचेत व आरोपींचेत सामाईक बांधावरुन वाद होत असतात. हे म्हणणे खरे आहे की, घटनेच्या पूर्वीदेखील आमचे दरम्याने वाद चालू होते. हे म्हणणे खरे नाही की, दि. ३१.०५.२०१६ नंतर दोन ते तीन दिवसांनी मी, माझे पती, माझा मुलगा व दीर यांच्यादरम्यान चर्चा झाली. हे म्हणणे खरे नाही की, फिर्याद देण्याअगोदर चर्चा झाली. साक्षीदार सांगते की, माझी माझ्या पतीसोबत चर्चा झाली. माझी माझ्या पतीशी हॉस्पीटलमध्ये चर्चा झाली. साक्षीदार सांगते की, आय.सी.यू मध्ये चर्चा झाली त्यामुळे तेथे आम्ही दोघेच होतो. हे म्हणणे खरे आहे की, चर्चेदरम्यान आम्ही असे ठरवले की, आरोपी आम्हाला त्रास देतात त्यामुळे त्यांचेविरुध्द फिर्याद दाखल केली पाहिजे. हे म्हणणे खरे आहे की, काय व कशी फिर्याद द्यायची हे सुध्दा माझ्या पतीने सांगितले. हे म्हणणे खरे आहे की, माझ्या पतीच्या सांगण्याप्रमाणे मी पोलीस स्टेशनला जाऊन फिर्याद दिली. हे म्हणणे खरे आहे की, मला घटनेची प्रत्यक्ष माहिती नव्हती. हे म्हणणे खरे नाही की, माझे पती पाहुण्यांना सोडून परत येताना पडले व त्यात त्यांना मार लागला. हे म्हणणे खरे नाही की, त्याचा गैरफायदा घेऊन मी माझ्या पतीशी संगनमत करुन खोटी फिर्याद दिली. आरडाओरडा ऐकून मी घटनास्थळी गेले तेव्हा माझे पती बेशुध्द पडले होते, दोन ते तीन दिवसांनी पती शुध्दीवर आले व शुध्दीवर आल्यानंतर त्यांनी मला घडलेला प्रकार सांगितला असा मजकूर मी पोलिसांना फिर्याद देतेवेळेस सांगितला होता. तसा मजकूर माझे फिर्यादीमध्ये का नमूद नाही याचे कारण मला सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे नाही की, दि. ३१.०५.२०१६ रोजी आरोपींनी माझ्या पतीला अडवले नाही व काठीने व

गजाने मारहाण देखील केली नाही. हे म्हणणे खरे नाही की, माझे पती बेशुध्द पडले नाही व त्यांना कोणी नांदगावला देखील घेऊन आले नाही. हे म्हणणे खरे नाही की, माझे पती दोन तीन दिवसांनी शुध्दीवर आले असे देखील घडले नाही. हे म्हणणे खरे नाही की, माझे सरतपासातील संपूर्ण मजकूर मी खोटा सांगितला आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी सांगते तशी तथाकथित घटना कधीही घडली नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी माझ्या पतीच्या व नातलगांच्या संगनमताने खोटी फिर्याद दिली आहे.

हे म्हणणे खरे आहे की, आरोपी अंबादास याने माझे पती, मुलगा तसेच ज्ञानेश्वर सोनवणे, राजू सोनवणे, गौरव सोनवणे, दीपक लोंढे, पोपट शंकर यांचेविरुध्द दि. ३१.०५.२०१६ रोजी दु. १२:०० वाजेच्या सुमारास त्यांना मारहाण केली अशा आशयाची तक्रार दाखल केली आहे व त्याबाबतचा खटला न्यायालयामध्ये चालू आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी आज रोजी खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास - पूर्ण**

**४. फेरतपास - नाही.**

श्रवणोत्तर स्विकृत

sd/-

(जे. एम. अग्निहोत्री)
न्यायदंडाधिकारी, प्रथम वर्ग
**नांदगांव.**
दि. ०८.०४.२०२५.

माझे समक्ष

sd/-

(जे. एम. अग्निहोत्री)
न्यायदंडाधिकारी, प्रथम वर्ग
**नांदगांव.**